# विलास को-ऑपरेटिव्ह बँक लि. लातूर

पहिला मजला, अपंग सारथी बिल्डींग,
जिवन विकास प्रतिष्ठान, गांधी मैदान, लातूर
फोन : ०२३८२-२५५५०५, २५५००५, २५९९५५
E-mail- vikasbankheadoffice@gmail.com
Website - www.vilasbank.co.in

## अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त बँकेच्या सभासदांसाठी)

जा.क्र. विलास बँक अ.वा.स.सभा. एच.ओ./ २६५/२०२६-२७

विलास को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची सन २०२५-२६ वर्षाची अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा **दि. २७/०९/२०२६ वार रविवार रोजी सकाळी ११.३० वा. बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा. आ. श्री. अमित विलासरावजी देशमुख साहेब** यांचे मार्गदर्शनाखाली **बँकेचे अध्यक्ष मा. ॲड. श्री. किरण शेषेराव जाधव साहेब** यांच्या अध्यक्षतेखाली **विष्णुदास मंगल कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, अंबाजोगाई रोड, लातूर** या ठिकाणी आयोजीत करण्यात आली आहे. तरी बँकेच्या सर्व सभासदांनी सदर सभेमध्ये सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.

## सभेपुढील विषय

१) मागील अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक मंजूर करणे.
३) आर्थिक वर्ष २०२५-२६ सालाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी / जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे व आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
४) मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशी नुसार सन २०२५-२६ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.
५) आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर झालेल्या वैधानिक लेखा परीक्षण अहवालाची नोंद घेणे. व दोष दुरूस्ती अहवालास मान्यता देणे.
६) आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी वैधानिक लेखापरीक्षक नेमणुकीबाबत, रिझर्व बँकने केलेल्या निर्देशास अधिन राहून, संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीस मान्यता देणे.
७) एक रक्कमी कर्ज भरणा करणाऱ्यास साल सन २०२५-२६ मध्ये व्याजातील सवलत रक्कमेस मान्यता देणे.
८) साल सन २०२५-२६ चे वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

स्थळ :- लातूर
दिनांक :- ०८/०९/२०२६

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**श्री. जितेंद्र काशिनाथराव सपाटे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**विशेष सुचना :-**

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा ठरलेल्या ठिकाणीच एक तासानंतर घेण्यात येईल. त्या सभेसाठी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. सभासदास काही प्रश्न विचारवयाचे असल्यास सभेच्या दिनांकापूर्वी सात दिवस अगोदर बँकेच्या मुख्य कार्यालयात लेखी प्रश्न सादर करावेत.
३. सभेपूर्वी १ तास अगोदर बँकेच्या सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, त्याला आपण उपस्थित रहावे ही विनंती.
४. ज्या सभासदांचे मोबाईल नं. बँकेत रजिस्टर्ड नाहीत अशा सभासदांनी मोबाईल नं. रजिस्टर्ड करून घ्यावेत.
५. ज्या सभासदांचे रू. १०००/- च्या पटीत भाग (शेअर्स) पोटी रक्कम जमा नाहीत त्यांनी रू.१०००/- च्या पटीत करून घ्यावी ही विनंती.
६. ज्या सभासदांनी KYC/CKYC ची पूर्तता केली नाही अशा सभासदांनी वेळेत पूर्तता करून घ्यावी.
७. सभासदांना विनंती करण्यात येते की, आपल्या पत्त्यामधील बदल त्वरीत नजीकच्या शाखेत कळवावा.